चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२२ ऑगस्ट, २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा आणि दंड

पोलीस स्टेशन गोंडपिंपरी अंतर्गत फिर्यादी पिडित अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस २१/०८/२०२० रोजी **मा. श्री. विरेंद्र केदार सर, जिल्हा न्यायाधीश व सत्र न्यायाधीश चंद्रपुर** यांनी शिक्षा ठोठावली आहे.

पोलीस स्टेशन गोंडपिंपरी अंतर्गत मौजा येणबोथला येथे दिनांक ०९/११/२०१७ रोजी फिर्यादी अल्पवयीन मुलगी ही आपल्या घरी एकटी हजर असतांना यातील आरोपी नामे रूपेश भुरूजी अवथरे वय २९ रा. येणबोथला तह. गोंडपिंपरी याने तिला घरी एकटे पाहुन तिला अश्लिल बोलुन आणि तिला हात लावुन तिचा विनयभंग केला अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन गोंडपिंपरी येथे अप.क्र. ५५१/२०१७ कलम ३५४, ३५४(अ) भादंवि सहकलम १२ पोक्सो कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा तपासात घेतल्यानंतर तत्कालीन **पोलीस उपनिरिक्षक श्री. विलास सोनुले, पोस्टे गोडपिंपरी** यांनी आरोपीस निष्पन्न करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २१/०८/२०२० **रोजी आरोपी नामे रूपेश भुरूजी अवथरे वय २९ रा. येणबोथला तह. गोंडपिंपरी** यास कलम ३५४, ३५४(अ) भादंवि सहकलम १२ पोक्सो **अंतर्गत २ वर्ष कारावासाची शिक्षा आणि ५,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ०६ महिने अतिरिक्त शिक्षा मा. श्री. विरेंद्र केदार सर, जिल्हा न्यायाधीश व सत्र न्यायाधीश चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. संदीप नागपुरे, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोना. निलरत्न उराडे, पोलीस स्टेशन गोंडपिंपरी यांनी काम पाहिले.

---